नि. फौजदारी खटला क्र. <u>२७५/२०२१</u>
सरकार विरूद्ध समिर खान
**निशाणी १५**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी</u>**
सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : सुलतान खॉ बिसमिल्ला खॉ पठान
वय : ४७ वर्षे,
धंदा : पोलीस हेड कॉस्टेबल, ब नं. १२७३,
नेमणुक : स्थानिक गुन्हे शाखा, अकोला.
राहणार : ह.मु. अकोला, ता. अकोला, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. ०४/०८/२०२१ रोजी मी अकोट शहर पोलीस ठाण्यात नाईक पोलीस कॉस्टेबल म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी सकाळी ०८:०० ते दुपारी २०:०० वाजेपर्यंत माझी ए.एस.आय १५६२, पो.कॉ २००२ व २४२४ यांचेसोबत गस्त कर्तव्यावर नेमणुक होती. सुमारे ११:०० वाजता आम्हाला गुप्त बातमी मिळाली की, एक ईसम शिवाजी महाविद्यालयाजवळ घातक शस्त्र बाळगुन आहे. सदर माहिती फोनद्वारे पोलीस निरीक्षक साहेब यांना आम्ही कळवली व दोन पंच बोलावले. दोन पंचासह आम्ही शिवाजी महाविद्यालयात गेलो असता त्याठिकाणी एक ईसम संशयास्पद हालचाली करतांना दिसला. त्याला जावुन आम्ही आमची ओळख दिली व येण्याचा उद्देश सांगितला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कंबरेला एक धारदार खंजर आम्हाला मिळुन आला. तो पंचासमक्ष आम्ही जप्त करून त्याचेवर चार पंचवीस प्रमाणे कारवाई केली. सदर खंजर १५.५ इंच लांब होता. सदर खंजर पंचासमक्ष जप्त करण्यात आला होता.

२. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर माझी व पंच साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्ती पंचनाम्यास **निशाणी १६** देण्यात येते.

३. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी व पंच साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **निशाणी १७** देण्यात येते.

४. सदर शस्त्र मी मालखान्यात जमा केले व त्याबाबत पावती प्राप्त केली. सदर पावती आता मला दाखवण्यात आली. त्यावर मालखाना मुनशी यांची सही आहे. सदर सही मी सहकर्मचारी असल्याने मी ओळखतो. त्यास **निशाणी १८** देण्यात येते.

५. मी सदर ईसमाविरूध्द फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखवली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **निशाणी १९** देण्यात येते.

६. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखवला. त्यावर देखील माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रथम खबर अहवालला **निशाणी २०** देण्यात येते.

७. मी सदर ईसमाला पाहिल्यास ओळखु शकतो. सदर ईसम आजरोजी न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहे. पुढील तपास पो.हे.कॉ गोपाल अघडते यांना सोपवण्यात आला. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲडव्होकेट श्री. मो. जुनेद यांचे मार्फत —**

८. गस्त कर्तव्यावर जात असतांना त्याबाबत स्टेशन डायरीला नोंद घेण्यात आली होती. मी माझ्या स्वत:च्या वाहनाने गस्त कर्तव्यावर होतो. मला माझे वाहनाचा नोंदणी क्रमांक सांगता येईल. पंचांना लेखी समजपत्र दिले होते. सदर समजपत्र मी तपास अधिकारी यांचेकडे दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, शिवाजी महाविद्यालयाच्या चारही दिशेने रस्ते असुन त्यावर वेगवेगळी दुकाने व लोकवस्ती आहे.

९. आरोपीला त्याची अंगझडती घेण्याआधी आम्ही आमची अंगझडती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातुन एक धारदार खंजर जप्त केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात नमुद घटना घडल्याचे खोटे

सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०५.०२.२०२६ (ए.ए. माळी)
अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.